खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : २४५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१७ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## आदिवासी क्षेत्रात रुग्णसेवेसाठी देण्यात आलेल्या रुग्णवाहिकांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, मुंबई :** स्व. लिलाराम जांगिड चॅरिटेबल ट्रस्ट आणि आमदार प्रवीण दरेकर यांच्यामार्फत ठाणे, पालघर जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात रुग्णसेवेसाठी सहा रुग्णवाहिका देण्यात आल्या आहेत. या सहा रुग्णवाहिकांचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वर्षा निवासस्थानी करण्यात आले.

यावेळी आमदार प्रवीण दरेकर, आमदार स्नेहा दुबे, आमदार परिणय फुके यांच्यासह स्व. लीलाराम जांगिड चॅरिटेबल ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित होते.

आदिवासी क्षेत्रात रुग्णसेवेत देण्यात येत असलेल्या रुग्णवाहिकांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्व. लिलाराम जांगिड चॅरिटेबल ट्रस्ट, आमदार प्रवीण दरेकर यांच्या कार्याचा गौरव केला. या रुग्णवाहिकांच्या माध्यमातून आदिवासी भागातील दुर्गम, डोंगराळ गावामध्ये सहजरित्या रुग्णवाहिकेची सेवा मिळणार असल्याने आदिवासी बांधवांना आपत्कालीन परिस्थितीत तातडीने उपचार उपलब्ध होण्याची अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

## ठाण्यात डोमिनोज पिझ्झा वर धाड; ४.५९ लाखांचा सिलेंडर साठा जप्त ९



**अक्षराज : जे. के.पोळ**


**दि.१६, मुंबई :** शिधावाटप भरारी पथकाने मोठी कारवाई करत ठाण्यातील वंडर मॉल परिसरातील डोमिनोज पिझ्झा स्टोअरवर धाड टाकून ४.५९ लाखांचा सिलेंडर साठा जप्त केल्याची माहिती नियंत्रक शिधावाटप कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

धाडीदरम्यान स्टोअरच्या तळघरात विविध तेल कंपन्यांचे सिलेंडर मोठ्या प्रमाणात साठवून ठेवलेले आढळले. यामध्ये एचपीसीएल, बीपीसीएल, आयओसी आणि गो गॅस कंपनीचे एकूण १४० सिलेंडर जप्त करण्यात आले. त्यापैकी ५५ सिलेंडर भरलेले तर ८५ सिलेंडर रिकामे असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

जप्त करण्यात आलेल्या सिलेंडरची एकूण किंमत ४ लाख ५९ हजार ४०० रुपये इतकी असून हा संपूर्ण मुद्देमाल सीलबंद करण्यात आला आहे. ही कारवाई अवैध साठा व नियमबाह्य वापराच्या संशयावरून करण्यात आली. या प्रकरणात एक आरोपीला अटक करण्यात आली असून त्याला चितळसर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. संबंधिताविरुद्ध जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू आहे.

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, चर्चगेट यांच्या आदेशानुसार तसेच उपनियंत्रक शिधावाटप 'फ' परिमंडळ, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईत भरारी पथकातील अधिकारी, शिधावाटप कार्यालय क्र. ४१ 'फ' ठाणे येथील कर्मचारी तसेच पोलिस अधिकारी सहभागी होते. व्यावसायिक ठिकाणी घरगुती गॅस सिलेंडरचा गैरवापर आणि बेकायदेशीर साठा रोखण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून कडक पावले उचलली जात आहे.

## पंढरपूर तालुका पोलिसांची कारवाई, सराईत गुन्हेगारास दोन वर्षाकरीता केले तडिपार



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१६, पंढरपूर :** पंढरपूर तालुका पोलिसांनी धडक कारवाई करीत सराईत गुन्हेगार समाधान बंडू चव्हाण वय ३० वर्ष राहणार शेगाव दुमला यास सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता केले तडीपार केले आहे. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलिसांनी सराईत गुन्हेगार समाधान बंडू चव्हाण वय ३० वर्षे राहणार शेगाव दुमला याची विरुद्ध दारू विक्रीचे वाळूचे चोरीचे मारहाणीचे अकरा गुन्हे दाखल असल्याने त्याच्यापूर्वी त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली असताना देखील सदर आरोपी मध्ये कोणतीही सुधारणा झाली नाही त्यांनी परत गुन्हे केल्याने सदर आरोपी विरुद्ध आगामी काळातील सण उत्सव च्या अनुषंगाने प्रतिबंध उपायोजना म्हणून आरोपी समाधान बंडू चव्हाण याचा दोन वर्षाकरिता तडीपारचा प्रस्ताव माननीय उपविभागीय दंडाधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर यांना पोलीस अधीक्षक यांच्या मार्फतीने पाठवण्यात आला होता.

त्या अनुषंगाने उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी आरोपी समाधान बंडू चव्हाण राहणार शेगाव दुमला यास सोलापूर जिल्ह्यातुन दोन वर्षाकरिता तडीपार केली आहे. सदरचा आदेश निर्गमित झाल्यानंतर पंढरपूर तालुका पोलिसांनी सदर आरोपी समाधान बंडू चव्हाण यास ताब्यात घेऊन सोलापूर जिल्ह्याच्या बाहेर पुणे ग्रामीण जिल्ह्यातील वालचंद नगर पोलीस स्टेशन येथे दाखल करून वालचंद नगर पोलीस स्टेशनला तडीपारची कारवाई पूर्ण करून वालचंद नगर पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, सहाय्यक पोलीस अधीक्षक, प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, विक्रम वडणे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय तोंडले, सहायक फौजदार आबा शेंडगे, पोलीस हवालदार सरगर, पोलिस हवालदार गावडे, पोलीस कॉन्स्टेबल सागर गवळी, पोलीस हवालदार मंगेश रोकडे, पोलीस कॉन्स्टेबल हसन नदाफ, चालक पोलीस कॉन्स्टेबल गोडसे यांच्या पथकाने केली.

# महाराष्ट्रात तब्बल २३ जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, मुंबई :** महाराष्ट्रात दिवसेंदिवस तापमानात प्रचंड वाढ होताना दिसत आहे. आगामी काळात तापमान उच्चांक गाठण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे १७ एप्रिलला तब्बल २३ जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे चिंता वाढली आहे.

**आज २३ जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा...**

राज्यात तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, महाराष्ट्रात आज (१७ एप्रिल) तापमान उच्चांक गाठण्याची शक्यता आहे. कारण तब्बल २३ जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. त्यामुळे नागरिकांना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. तसेच दुपारच्या वेळी घराबाहेर न पडण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**कोणकोणत्या जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा?**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, १७ एप्रिलला कोकण किनारपट्टीवरील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यांना, यासोबतच धुळे, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, सातारा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, अकोला, अमरावती, बुलढाणा, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. या सर्व जिल्ह्यांतील नागरिकांना दुपारी १ ते ४ या वेळेत घराबाहेर न पडणयाचं आवाहन करण्यात आलं आहे.

**दोन जिल्ह्यांना वादळी पावसाचा इशारा...**

असं असलं तरी २ जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेसह वादळी पावसाचा देखील इशारा देण्यात आला आहे. राज्यातील सांगली आणि सोलापूर या दोन जिल्ह्यांना दिवसभराच्या कडाक्याच्या उन्हानंतर संध्याकाळच्या वेळी ढगांच्या गडगडाट, विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

**१८ तारखेला काय होणार?**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, काही ठिकाणी तापमान तुलनेने कमी होईल. केवळ जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, अकोला, अमरावती, नागपूर, वर्धा या १० जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. पण यापैकी काही जिल्ह्यांमध्ये दिवसभराच्या कडाक्याच्या उन्हानंतर संध्याकाळी वातावरणात बदल होवून वादळी पावसाची शक्यता आहे.

**१८ तारखेला कुठे पाऊस पडण्याची शक्यता आहे.**



हवामान विभागाच्या अंदाजानुसार, सोलापूर, हिंगोली, नांदेड, धाराशिव या चार जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजाच्या कडकडाटासह वादळी, हालका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. यावेळी सोसाट्याचा वारा (३०-४० किमी प्रतितास) सुटण्याची देखील शक्यता आहे.

**१९ तारखेला वातावरणात मोठा बदल होणार, अनेक ठिकाणी पाऊस पडणार**

दोन दिवसांनी १९ एप्रिलला वातावरणात मोठा बदल होणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, या दिवशी अकोला आणि अमरावती या ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा असणार आहे. इतर ठिकाणी वातावरण थंड होण्याची शक्यता आहे. तर काही जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. यामध्ये धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, सोलापूर, नांदेड, लातूर, धाराशिव अशा ८ जिल्ह्यांचा समावेश असणार आहे.

**२० तारखेला ९ जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट**

येत्या २० एप्रिलसाठी हवामान विभागाकडून ९ जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. यामध्ये अहिल्यानगर, पुणे, सातारा, परभणी, हिंगोली, नांदेड, अकोला, अमरावती, बुलढाणा या जिल्ह्यांचा समावेश आहे.

## कोल वॉशरीजमुळे होणाऱ्या प्रदूषणावर कठोर कारवाई होणार : पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** चंद्रपूर तालुक्यातील बेलसनी परिसरातील कोल वॉशरीजमुळे वाढत चाललेल्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी आज प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रदूषण पूर्णपणे कमी करण्यासाठी ठोस आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतील, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कोल वॉशरीजवर कठोर कारवाई केली जाईल, अशी ठाम ग्वाही त्यांनी दिली.

विधानसभेत या गंभीर विषयाकडे लक्ष वेधत ज्येष्ठ नेते आ. सुधीर मुनगंटीवार यांनी कोल वॉशरीजमुळे होणाऱ्या प्रदूषणाचा मुद्दा प्रभावीपणे मांडला होता. त्यांच्या पाठपुराव्यामुळेच या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले गेले असून आजच्या पाहणी दौऱ्याद्वारे त्या आश्वासनाची पूर्तता होत असल्याचे दिसून आले.

महामाया कोल वॉशरीजमुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या कापूस पिकावर मोठ्या प्रमाणात काळ्या धुळीचा थर साचून नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर



कृषी विभाग, महसूल विभाग व प्रदूषण नियंत्रण विभाग यांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त समिती गठित करण्यात आली असून, त्यांच्या अहवालानुसार शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची कार्यवाही सुरू आहे.

या पाहणीदरम्यान बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, आज माझ्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर परिसरात स्वच्छता करण्यात आली असली, तरी ही तात्पुरती उपाययोजना असून पुढील भेटीदरम्यान प्रदूषणात लक्षणीय घट झालेली दिसली पाहिजे. यासाठी संबंधित यंत्रणांनी जबाबदारीने काम करावे.

दरम्यान, आ. सुधीर मुनगंटीवार यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष वेधताना सांगितले की, संयुक्त समितीच्या अहवालात सुमारे ६० ते ६५ टक्के नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले असून त्या अनुषंगाने नुकसानभरपाई देण्याची शिफारस करण्यात आली आहे. आज शेतकऱ्यांना नुकसानभरपाईचे धनादेश मिळतील, अशी अपेक्षा होती; मात्र प्रशासनाकडून अपेक्षित गती दिसून येत नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. पंकजाताई या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालतील आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देतील, असा आम्हाला विश्वास आहे. सुधीरभाऊंच्या मार्गदर्शनाखाली या भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले.

या दौऱ्या दरम्यान जिल्हाधिकारी वसुमना पंत, मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. पुलकित सिंह, भाजप नेते राजेंद्र गांधी, ब्रिजभूषण पाझारे, अनिल डोंगरे, विक्की लाडसे, विजय आगरे, भारत रोहणे, बापूजी भोंगळे, पराग तुराणकर, शोभा पिदुरकर, तानेबाई वाघमारे सरपंच म्हातारदेवी आदींची उपस्थिती होती.

## खापरखेडा दुमदुमला डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त अभूतपूर्व जल्लोष

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, नागपूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त खापरखेडा परिसरात उत्साह, ऊर्जा आणि एकात्मतेचे अनोखे दर्शन घडले. बौद्ध विहार, शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच शाळा–महाविद्यालयांमध्ये १४ एप्रिल रोजी जयंती मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली.

सायंकाळी आयोजित भव्य मिरवणुकीने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. हजारोंच्या संख्येत नागरिक सहभागी झाल्याने जनसागर उसळल्याचे चित्र पाहायला मिळाले. या मिरवणुकीत आमदार डॉ. आशिष देशमुख, माजी मंत्री सुनील केदार तसेच इतर मान्यवरांनी उपस्थिती लावत उत्साहात भर घातली.

सत्यशील बौद्ध विहार, नवीन बिना बौद्ध विहार, सम्यक बौद्ध विहार (चिचोली), महामाया बौद्ध विहार (जय भोले नगर) आणि सुजाता बौद्ध विहार (चनकापूर) आदी ठिकाणी डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी शेकडो बौद्ध उपासक–उपासिका तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सायंकाळी ७ वाजता मिरवणुकीला सुरुवात झाली. खापरखेडा, भानेगाव, चिचोली, जयभोले नगर, चनकापूर आदी भागांतून मिरवणुका मुख्य बाजारपेठ व रेल्वे चौकी येथे एकत्र आल्या. मार्गावर ठिकठिकाणी स्वागतद्वार उभारण्यात आले होते. विविध सामाजिक व राजकीय संघटनांकडून शरबत, मठ्ठा, आईस्क्रीम, दूध तसेच विविध खाद्यपदार्थांचे वितरण करण्यात आले.

डीजे साऊंड, बँड, बग्गी, आकर्षक रोषणाई आणि विविध झांक्यांनी सजलेली मिरवणूक नागरिकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरली.फटाक्यांच्या आतषबाजीने वातावरण दणाणून गेले, तर तरुण, महिला व बौद्ध बांधवांनी उत्स्फूर्तपणे नृत्य करत उत्सवात रंग भरला.

मिरवणुकीदरम्यान आमदार डॉ. आशिष देशमुख, माजी मंत्री सुनील केदार, डॉ. राजीव पोतदार यांनी हजेरी लावत नागरिकांमध्ये उत्साह निर्माण केला.

या सोहळ्यास रिपाई नेते पृथ्वीराज बोरकर, अध्यक्ष मनोहर डोंगरे, दीपक गेडाम, बबलू ठाकूर, पृथ्वीराज बागडे, प्रकाश लांजेवार, राहुल बागडे, केवल मेंढे, भीमराव आवळे, अजय सहारे, धिरज देशभ्रतार, रमेश जैन, दिवाकर घेर, अमर जैन, सरपंच शालिनी चवरे, मीनाक्षी तागडे, उपसरपंच सोनू बोरकर, हेमराज परिहार, रविंद्र चिखले, अनेश चवरे, आशिष फुटाणे, विजय वासनिक, सुनील जालंदर, अभय मिश्रा,



कपिल वानखेडे, केशव पानतावणे, गिरधारी शर्मा, मयूर तिरपुडे, राजेश खंडारे, विनोद गोडबोले, सादिक शेख, विक्की थापा, मंगेश चौरपगार, श्यामराव सरोदे, राजेश गायकवाड, चंद्रशेखर पानतावणे, राम डाखरे, विलास महल्ले, सुरेश राम टेके, डॉ. जितेंद्र तागडे, मुकेश बागडे, राजेंद्र मेश्राम, नरेश पानतावणे, दिलीप रामटेके, दिक्षम डोंगरे, सुमेध चव्हाण, प्रशांत पाटील, निखिल भिमगडे, प्रीतम सोमकुवर, सुभाष मेश्राम यांच्यासह हजारो बौद्ध उपासक व उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खापरखेडा परिसरात साजऱ्या झालेल्या या जयंती उत्सवाने सामाजिक एकोपा, बंधुता आणि समानतेचा प्रभावी संदेश देत नागरिकांच्या मनावर ठसा उमटवला.




## वगळलेले मतदार !

विधानसभा निवडणूक तोंडावर असताना पश्चिम बंगालमधील ९० लाख मतदारांची नावे वगळली ही घटना केवळ प्रशासकीय नाही, तर राजकीय आहे. ममता बॅनर्जी यांनी याला 'राजकीय षडयंत्र' म्हटले आहे. त्यांच्या मते, अमित शहा आणि भाजप यांच्या दबावाखाली निवडणूक आयोग ही कारवाई करत आहे. नावे वगळल्याचा बदला मतदानातून घेण्याचे आवाहन त्यांनी मतदारांना केले आहे. तृणमूल काँग्रेसने याला 'मतदारांची हकालपट्टी' असे संबोधले आहे. भाजपने मात्र अपेक्षेप्रमाणे या प्रक्रियेचे स्वागत केले आहे. त्यांच्या मते, हे 'मतदारयादीचे शुद्धीकरण' आहे, सर्वच राज्यांत ते होत असते.

पश्चिम बंगालसारख्या राजकीयदृष्ट्या संवेदनशील राज्यात मतदारयाद्यांमधून नावे वगळली जाण्याचा मुद्दा गेल्या काही वर्षांत वारंवार चर्चेत आला आहे. मोठ्या प्रमाणात मतदारांची नावे यादीतून काढून टाकली जात असल्याचे आरोप पश्चिम बंगालमध्ये अनेक वेळा झाले आहेत. हा मुद्दा विशेषतः ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकार आणि भारतीय जनता पक्ष यांच्यातील संघर्षाचा केंद्रबिंदू बनला आहे.

वस्तुनिष्ठपणे पाहिले तर मतदारयादी स्वच्छ ठेवणे गरजेचे आहेच. मृत व्यक्ती किंवा बोगस नावे निवडणुकीला कलंकित करतात; पण बंगालसारख्या राज्यात, जिथे राजकीय हिंसा, घुसखोरी आणि धार्मिक ध्रुवीकरण हे सामान्य आहे, तिथे ही प्रक्रिया जास्त संवेदनशील बनते. तृणमूलच्या दृष्टिकोनातून ही व्होट बँक चोरी आहे. भाजपच्या दृष्टिकोनातून हे 'स्वच्छ भारत अभियाना'सारखे 'स्वच्छ मतदार अभियान' आहे. वास्तव कदाचित मधले काही तरी असेल, कारण काही प्रमाणात शुद्धीकरण आवश्यक आहेच, पण अंमलबजावणीमध्ये पक्षीय प्रभाव असू शकतो आणि तो नसणे ही लोकशाहीची गरज आहे.

महाराष्ट्रातही मतदारयादी शुद्धीकरण होते, पण इतक्या मोठ्या प्रमाणात नावे वगळली जात नाहीत. बंगालचे राजकारण नेहमीच 'दीदी विरुद्ध दादा' (ममता विरुद्ध मोदी/शहा) असे दिसते. २०२१च्या निवडणुकीत तृणमूलने भाजपला रोखले होते. यावेळी, २०२६ मध्ये सखोल मतदार पडताळणी (एसआयआर) गेमचेंजर ठरू शकते. निवडणूक आयोगाने पारदर्शकता राखली तर लोकशाही मजबूत होईल. अन्यथा, हिंसा आणि अविश्वास वाढेल. प. बंगालचे भवितव्य या प्रक्रियेवर अवलंबून आहे. मतदारांनी आपले नाव यादीत समाविष्ट करण्यासाठी अपील करावे आणि शांततेने मतदान करावे, असे आयोगाने म्हटले आहे.

मतदारयादीतून नावे वगळण्याची काही वैध कारणे असतात. मृत्यू, स्थलांतर, दुबार नोंदणी, दस्तऐवज अपूर्णता या कारणांनी नावे वगळली जातात. परंतु, पश्चिम बंगालमध्ये याचे कारण राजकीय असल्याचा आरोप केला जात आहे, प्रक्रियेचा गैरवापर होत आहे, असा विरोधकांचा दावा आहे. हा संघर्ष विशेषतः निवडणुकीच्या काळात तीव्र होतो. विधानसभा किंवा लोकसभा निवडणुकीपूर्वी मतदारयादीत मोठे बदल दिसतात. तृणमूल काँग्रेस आणि भाजप, दोघेही असा दावा करतात की प्रशासनावर दबाव टाकून त्यांच्या मतदारांना वगळले जात आहे.

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीत ७ कोटी ४ लाख ५९ हजार २८४ मतदार मतदानासाठी पात्र आहेत. यामध्ये ३ कोटी ६० लाख २२ हजार ६४२ पुरुष, ३ कोटी ४४ लाख ३५ हजार २६० महिला आणि १, ३८२ पारलिंगी व्यक्तींचा समावेश आहे. पारलिंगी व्यक्तींची संख्या यासाठी महत्त्वाची, की नुकतीच तृणमूल काँग्रेसने समलिंगी व्यक्तींसंबंधात सकारात्मक भूमिका घेतली असून मेनका गुरुस्वामी यांच्यासारख्या नेत्यांनी आपली समलिंगी लैंगिक ओळख उघडपणे मांडली आहे. पक्षाने त्यांना राज्यसभेत खासदारही केले आहे.

भारतीय निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, ऑक्टोबर २०२५ पासून एकूण ९१ लाख २ हजार ५७७ मतदारांना वगळण्यात आले, ज्यामुळे एकूण पात्र मतदारांची संख्या ११.८८ टक्क्यांनी कमी होऊन ६ कोटी ७५ लाख ३४ हजार ९५२ झाली, जी ऑक्टोबर २०२५ मध्ये ७ कोटी ६६ लाख ३७ हजार ५२९ होती. मतदार यादी शुद्ध करण्यासाठी सखोल मतदार पडताळणी प्रक्रिया (एसआयआर) नोव्हेंबर २०२५पासून सुरू झाली. पहिल्या टप्प्यात ५८.२० लाख नावे वगळली गेली, नंतर आणखी लाखो नावे बाद झाली. डिसेंबर २०२५ ते एप्रिल २०२६ पर्यंत एकूण ९० लाखांहून अधिक नावे वगळण्यात आली. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या एकट्या भवानीपूर मतदारसंघात ४०-४७ हजार नावे वगळली गेल्याचा दावा आहे.

**- जयंत माईणकर**

# अनधिकृत फेरीवाल्यांना हटवण्यासाठी सैन्याला बोलवायचे का ?



राज्यातील जवळपास सर्वच प्रमुख शहरांमध्ये अनधिकृत फेरीवाल्यांची समस्या जटील बनत चालली आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई सारख्या गर्दीच्या शहरांतील जवळपास सर्वच रेल्वे स्थानकांचा आजूबाजूचा परिसर अनधिकृत फेरीवाल्यांनी गिळंकृत केला आहे त्यामुळे शासनाने ठरवलेले फेरीवाला धोरण नक्की कोण राबवते आहे हा यक्षप्रश्न शहरांतील नागरिकांना पडला आहे. रेल्वे स्थानक परिसरातील पदपथ प्रशासनाने नागरिकांना चालण्यासाठी बनवले आहेत की फेरीवाल्यांना आपली दुकाने थाटण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली आहे हासुद्धा प्रश्न आज पडतो आहे. मुंबईतील रेल्वे स्थानक परिसर नागरिकांसह विविध प्रकारच्या वाहनांनीही नेहमीच गजबजलेला असतो. एकीकडे पदपथ फेरीवाल्यांनी व्यापलेला असतो तर दुसरीकडे रस्त्याच्या कडेने चालायचं म्हटलं तर जीव मुठीत घेऊन चालावे लागते. कोणते वाहन येऊन पाठीमागून धडकेल याची काहीच शाश्वती नसते. 'मुंबई महानगरपालिका, म्हाडा, पोलीस यांच्याकडून न्यायालयाच्या आदेशांचे पालन केले जात नाही, अनधिकृत फेरीवाल्यांचा प्रश्न गंभीर बनला आहे. पोलिसांना अनधिकृत फेरीवाल्यांना हटवता येत नसेल, तर सैन्याला बोलवायचे का ?' अशा कडक शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने जुलै २०२४ मध्ये आपली उद्विग्नता व्यक्त केली होती. मात्र त्यानंतरही प्रशासनावर काडीमात्र फरक पडलेला नाही. वाढत्या लोकसंख्येचा मुंबई शहरावर पडणारा अतिरिक्त भार, रस्ते रुंदीकरण, उड्डाणपूल, मेट्रो रेल्वेमार्ग यांसारख्या विकासकामांमुळे रस्त्यांची झालेली दुर्दशा, त्यातच शहरातील वाढत्या वाहनांमुळे ठिकठिकाणी होणारी वाहतूक कोंडी यांमुळे शहराचा श्वास कोंडतो आहे, फेरीवाल्यांनी सारे मार्ग दुतर्फा व्यापून टाकल्यामुळे त्यांच्या मागे असलेली अधिकृत दुकाने जी सरकारला वेळच्या वेळी कर भरतात ती झाकली जात आहेत. ज्याचा परिणाम या व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर होत आहे. महानगरपालिका अधिकारी आणि पोलीस यांपैकी कोणीच या अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करत नसल्याने आणि केली तरी ती केवळ नावापुरती असल्याने फेरीवाल्यांपासून सुटका करण्यासाठी सातत्याने कोणीनाकोणी न्यायालयाचे दरवाजे ठोठावत असतात.

२०१७ साली मुंबईतील एल्फिन्स्टन(आताचे प्रभादेवी) रेल्वे स्थानकाच्या पुलावर झालेल्या दुर्घटनेतून बोध घेऊन पालिका प्रशासनानेही मुंबईतील रेल्वे स्थानकापासून १५० मीटर अंतरावर पांढरे पट्टे आखून त्यांच्या आतील परिसरात फेरीवाल्यांना बसण्यास मज्जाव करणारा नियम बनवला. त्यानंतर या पट्ट्याच्या आत फेरीवाले बसणार नाहीत याची काळजीही प्रशासनाकडून काही दिवस घेण्यात आली; मात्र थोड्याच दिवसांत हा नियम बासनात बांधून रेल्वे स्थानकाजवळ पुन्हा फेरीवाले बसू लागले. रेल्वे स्थानकांजवळ रस्त्यांच्या दुतर्फा पदपथ फेरीवाल्यांनी व्यापल्यामुळे लोकांना रस्त्यावरून मार्गक्रमण करावे लागते. फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी अधूनमधून महापालिकेची गाडी परिसरात फिरते मात्र ती येणार असल्याची बातमी फेरीवाल्यांना आधीच मिळाल्याने ते आपला माल झाकून ठेवून दूर निघून जातात. गाडी तेथून निघून गेली कि हे अनधिकृत फेरीवाले पुन्हा त्या ठिकाणी आपले बस्तान मांडतात. मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या परिसरात अनधिकृतपणे बसणाऱ्या फेरीवाल्यांमध्ये बांगलादेशी तरुण मोठ्या प्रमाणात असल्याचे मध्यंतरी उघड झाले होते. या फेरीवाल्यांना बस्तान मांडण्यासाठी पदपथांवर जागा उपलब्ध करून देणे, त्या ठिकाणी विजेचे कनेक्शन उपलब्ध करून देणे, भांडवल उपलब्ध करून देणे, पोलीस आणि महापालिका यांच्या कारवाईपासून त्यांना वाचवणे यासाठी प्रत्येक रेल्वेस्थानक परिसरात म्होरके कार्यरत असून या म्होरक्यांचे महापालिका अधिकारी, स्थानिक पोलीस आणि लोकप्रतिनिधी यांच्याशी आर्थिक हितसंबंध असतात ज्यामुळे त्यांचे हे धंदे वर्षोनुवर्षे बिनदिक्कतपणे सुरु आहेत. मुंबई-ठाण्यासारख्या मराठीबहुल शहरांत बहुतांश फेरीवाले हे परप्रांतीयच आढळून येतात. हे अनधिकृत परप्रांतीय फेरीवाले त्यांच्याकडे येणाऱ्या ग्राहकांसोबत अरेरावीने वागतात, त्यांच्याकडून वस्तू खरेदी न केल्यास ग्राहकांशी विनाकारण वाद घालतात. या मुजोर फेरीवाल्यांकडून स्थानिक ग्राहकांना आणि रहिवाशांना मारहाण केल्याच्या घटना अधूनमधून घडत असतात. सर्वसामान्य नागरिकांपेक्षा अनधिकृत फेरीवाल्यांची अधिक काळजी घेणाऱ्या महानगरपालिका आणि पोलीस प्रशासनाला न्यायालयाच्या आदेशानंतरही या अनधिकृत फेरीवाल्यांना हटवायचे नसेल तर नागरिकांच्या सुरक्षेसाठी भविष्यात सैन्याला पाचारण करण्याची वेळ आल्यास आश्चर्य वाटायला नको !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# कष्टकऱ्यांच्या ऊद्रेकाचा 'सांगावा'

काही दिवसांपूर्वी दिल्लि जवळच्या नोएडा येथे कष्टकरी कामगारांच्या संयमाचा ऊद्रेक झाला आणि त्याचे रूपांतर हिंसक आंदोलनात झाले आणि नेहमीप्रमाणे शासन-प्रशासन, पोलिसांनी कामगारांवर दडपशाही केली, आता अनेकांवर गुन्हे दाखल केले जात आहे. वास्तविक या ऊद्रेकाचे कारण म्हणजे एकाच कंपनीत काम करणाऱ्या हरयाणात कर्मचाऱ्यांना वेतनवाढ दिली गेली मात्र नोएडातील कामगारांना वेतनवाढ वाढ मिळत नव्हती. या आंदोलनाचे लोणं ईतरस्त्र पसरले आणि कामगारांच्या वेतनवाढीच्या प्रश्नाकडे ऊत्तर प्रदेश सरकारला लक्ष घालावे लागले आणि गाझियाबाद, नोएडा येथील कामगारांना वेतनवाढ देत किमान वेतन वाढविण्याचा निर्णय घेतला गेला आणि त्याची अंमलबजावणी १ एप्रिल पासून करण्याचे आदेश निघाले.यानुसार अकुशल, अंशतः कुशल आणि कुशल कामगारांच्या वेतनात दीड ते तीन हजार रुपयांची वाढ केली, ही वेतनवाढ झाली असली तरी कुणालाही जास्तीत जास्त वीस हजार रुपयांच्या वर वेतन मिळणार नाही मात्र झालेली वेतनवाढ हे ही नसे थोडके. आठ तासांचे कामाचे तास ठरलेले असतांना दहा बारा तास करून घेतले जाते आणि ओव्हरटाईमचे पैसे देखील दिले जात नाही हा कामगारांचा मुख्य आक्षेप त्याच बरोबर आठवड्याची सुटी देखील नाही.आता आठवड्याची सुटी आणि ओव्हरटाईम काळात वेतन दुप्पट करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे.दिल्लि नोएडा सारख्या शहरांत किमान तीन कुटुंबाचा खर्च भागविण्यासाठी कमीतकमी पंचवीस तीस हजार रुपये आवश्यक आहे.

केवळ नोएडा येथेच कष्टकऱ्यांचा ऊद्रेक झाला नाही तर देशातील अनेक राज्यात तो होत आहे. राजस्थान मधील भिवाडी, तसेच मध्य प्रदेश ऊत्तर प्रदेश, बिहार, हरियाणातील मानेसर, पानिपत येथे देखील असाच ऊद्रेक होत आहे. नवीन तीन कामगार कायद्यात सुधारणा झाल्या मात्र ते कामगार हितापेक्षा मालक धार्जिणेच, मालकांचे हित साधणारे ठरत आहेत. आजकाल कंत्राटीकरण आणि खाजगीकरणामुळे जवळपास सर्वच ठिकाणी कष्टकरी वर्गाची आर्थिक पिळवणूक केली जाते. लाखो करोडो रुपये खर्च करुन शिक्षण घेतल्यानंतर देखील पंचवीस तीस हजारावर तरुणांना काम करावे लागते आहे ते देखील कंत्राटी पद्धतीने आणि बारा बारा तास राबुन. दिल्ली एनसीआर मधे एका सॉफ्ट वेअर इंजिनिअरला केवळ नऊ रूपये पगारवाढ. नोटीस पिरियड आणि करार यामुळे नोकरी सोडणे देखील शक्य नाही ही क्रुर चेष्टा नाही का? शासन प्रशासन कितीही म्हणत असले की आम्ही कामगारांच्या बाजुने आहे मात्र सरकार नेहमीच धनदांडगे ऊद्योगपती, कार्पोरेट कंपन्या यांच्यासाठीच झटत असते. यांच्या कडुनच जवळपास सर्वच राजकीय पक्षांना देणगी म्हणून करोडो रुपये दिले जातात विशेषतः सत्ताधारी पक्षाला त्याच बरोबर अनेक आर्थिक सोयीसवलती पदरात पाडून घेतले जातात. शिवाय कंपनीने घेतलेले कर्ज बुडित झाले कि त्यांना बेल आउट पॅकेज दिले जाते करोडो रुपयांची कर्जमाफी दिली जाते, तडजोडीच्या नावाखाली अत्यंत नाममात्र रकमेत तडजोड केली जाते या सगळ्यांत आर्थिक नुकसान होते ते जनतेचेचत्याचवेळी कष्टकऱ्यांना किमान वेतन देखील दिले जात नाही हा विरोधाभास कोण लक्षात घेणार?. जिकडेतिकडे कष्टकऱ्यांचे आर्थिक शोषण चालले आहे आणि आजकालच्या नोकऱ्या म्हणजे केवळ गुलामगिरी झाली आहे. त्याच बरोबर ना नोकरीची शाश्वती ना भवितव्याची खात्री. दिवसेंदिवस महागाई वाढत आहे, खर्च वाढत आहे मात्र त्याप्रमाणात ऊत्पन वाढत नाही त्यामुळे महिन्याचे आर्थिक गणित जुळत नाही, त्याची परिणती अशा असंतोषामधे होणे अपरिहार्यच आहे.सरकार कामगार कायदे देखील ऊद्योगधंदे धार्जिणे बनवत आहेत. ऐकिकडे अधुन मधुन मोठी परदेशी गुंतवणूक आणल्याचे, गुंतवणुकीचे करार केल्याचे दावे केले जातात, हजारो नोकऱ्या उपलब्ध होतील असे सांगितले जाते त्याच वेळी आहे त्या कामगारांची अशी परवड होत आहे. महाराष्ट्रात निवडणूक काळात मागेल त्याला एमआयडीसीची घोषणा प्रचार सभेत केली गेली मात्र राज्यातील औद्योगिक विकास किती होत आहे हे ये पब्लिक है ये सब जानती है. नाशिक परिसरात कधी काळी सातपुर तसेच संभाजी नगर मधील वाळुंज एमआयडीसी या मधे मोठ्याप्रमाणावर रोजगार निर्मिती होत होती आज काय अवस्था आहे. अनेक ऊद्योग राज्याबाहेर जात आहे ते वेगळेच. कामगार चळवळ, कामगार संघटना या दिवसेंदिवस क्षीण केल्या जात आहे. कामगार न्यायालये, कामगार खाते यांची नेमकी भुमिका कोणती असा प्रश्न पडतो. कष्टकरी, मध्यमवर्गीय, नोकरदार, शेतकरी लागतो तो केवळ मते मिळविण्यापुरताच. गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. शेवटी हे सगळे गळ्याशी आले कि असा ऊद्रेक होणारच. गेल्या काही वर्षांपासून देशात कुठेही आंदोलन, निदर्शने झाली की त्यात अर्बन नक्षलवादी, देशद्रोही ठरवण्याचा प्रयत्न केला जातो आणि जखमेवर मीठ चोळले जाते.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

## तो वरचा

मोल कळते कष्टाचे
लागल्या वरती ठेचा
गोळा करे सारे फुले
कधी तरी काटे वेचा

सुडौल हो कलाकृती
असे महत्वाचा ढाचा
आकर्षक इमारतीचा
भक्कम पायथा रचा

यशलाभ मुश्किलीने
मोरपीस टोपा खोचा
जाणीव वाटचालीची
झिजल्या वरती टाचा

ओळखावे समोरच्या
चेहरेअंतर्मनात वाचा
बोलावे तोलून मापून
बसेलं अचंबित वाचा

अल्प फायद्यात तोटा
विचार करावा दूरचा
मृगजळ प्राप्ती साठी
सोडूनये पत्ता हातचा

योग्यवेळी पडोपडदा
दोर कौशल्याने खेचा
अनुभव हा महानगुरु
सोडवालं कठीणपेचा

आपल्यापेक्षा अधिक
जपावे नोकरखालचा
वर मिळे विनासायास
आशिर्वाद देतो वरचा

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# स्मार्ट कार्ड नसले तरी सवलत सुरूच; महिलांसह सर्व पात्रांना लाभ

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१६, जिंतूर :** राज्य परिवहन महामंडळाच्या सवलतीच्या प्रवास योजनेअंतर्गत स्मार्ट कार्ड नसलेल्या पात्र लाभार्थींनाही सवलतीचा प्रवास सुरूच असल्याचे स्पष्टीकरण जिंतूर आगारप्रमुख आनंद चव्हाण यांनी दिले आहे. तसेच प्रवाशांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी केले आहे.




राज्य परिवहन महामंडळामार्फत ६५ वर्षे व ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग प्रवासी तसेच महिलांना सवलतीच्या दरात प्रवासाची सुविधा दिली जाते. महिलांसाठी अर्ध्या तिकिटदरात (५०% सवलत) प्रवासाची योजना सुरू असून, मोठ्या प्रमाणात महिला प्रवासी या योजनेचा लाभ घेत आहेत.

या योजनेअंतर्गत स्मार्ट कार्ड वितरण प्रक्रिया सध्या सुरू असून अनेक प्रवाशांकडे अद्याप स्मार्ट कार्ड उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे स्मार्ट कार्ड नसल्यास सवलत मिळणार नाही, अशी चुकीची समजूत काही ठिकाणी पसरली आहे.

याबाबत आगारप्रमुख आनंद चव्हाण यांनी स्पष्ट केले की, ज्यांच्याकडे सध्या स्मार्ट कार्ड उपलब्ध नाही अशा पात्र लाभार्थींनाही नियमानुसार सवलतीचा लाभ दिला जात आहे आणि पुढेही दिला जाणार आहे. सवलतीची प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात येत असून, पात्र प्रवाशांनी लवकरात लवकर स्मार्ट कार्ड काढून घ्यावे, असेही त्यांनी सांगितले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## लोककल्याण बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने आंबेडकर जयंती विविध उपक्रमांतर्गत उत्साहात साजरी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, नागपूर :** खापरखेडा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त लोककल्याण बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने भव्य सजावट, मानवंदना, महाप्रसाद व रॅली स्वागतचे आयोजन करण्यात आले. मुख्य मार्गावर ४० ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सुविचाराचे बॅनर लावून भव्य सजावट करण्यात आली जे आकर्षनाचे केन्द्र ठरले. आयोजित कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून आमदार आशिष देशमुख, बिजेपी नेते राजीव पोद्दार, सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब बोरकर, अमरचंद जैन, बबलु ठाकुर, दिवाकर घेर, पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनील जालंदर, सरपंच मिनाक्षीताई तागडे, पोलीस निरीक्षक हरीश रुमकर, रमेश जैन, कपिल वानखेडे, अभय मिश्रा , मयुर तिरपुडे, विनोद गोडबोले, श्यामराव सरोदे, विलास महल्ले, चंद्रशेखर पानतावने, आशिष फुटाने, राम डाखरे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संस्थेतर्फे ठीक ठिकाणावरून आलेल्या सर्व रॅलींचे भव्य स्वागत करण्यात आले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त लोककल्याण बहुउद्देशीय संस्थेचे आयोजित कार्यक्रम दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सुद्धा आकर्षक ठरले. संस्थेच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्त्या संगीताताई वाकपाजंर, पत्रकार शुभम वाकपांजर, आईसाहेब सुर्यकान्ताताई खंडारे यांनी केले तर संयोजन सामाजिक कार्यकर्ते राजेश खंडारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी दिनेश खंडारे, हर्ष वाकपांजर, विकास वाकपांजर, कविश्वर वाहाने, रंजीता वाहाने, मनिषा खंडारे, आदित्य वाहाने, वसंतराव मुन, वंसतराव गोडबोले, हिरामन शेंडे, पवन धुर्वे, प्रभाताई आवळे, प्रकाश राऊत, जिया वाहाने, गुजंन खंडारे, मानसी खंडारे, साक्षी खंडारे, देवराज खंडारे , पृथ्वीराज खंडारे यांच्यासह अनेकांचे सहकार्य लाभले.

## विठ्ठलगाव आल्याणी येथे १०९ वा पारंपरिक यात्रा उत्सव भक्तिमय वातावरणात संपन्न...



**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१६, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील श्री क्षेत्र विठ्ठलगाव आल्याणी येथे असलेल्या १०९ वर्षे जुन्या श्री विठ्ठल-रखुमाई मंदिराचा वार्षिक यात्रा उत्सव यंदाही मोठ्या उत्साहात, भक्तिभावात आणि पारंपरिक थाटामाटात पार पडला. श्री पांडुरंगाच्या कृपेने, संतांच्या आशीर्वादाने आणि ग्रामस्थांच्या एकजुटीने हा चार दिवसीय सोहळा अविस्मरणीय ठरला.

या उत्सवाचे आयोजन वै. ह.भ.प. भाऊ कुशा खाडे व राष्ट्रीय कीर्तनकार वै. ह.भ.प. भिमनाथ सावळाराम देशपांडे (जुन्नर) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. ग्रामस्थ मंडळ आणि विठ्ठलगाव आल्याणी येथील नागरिकांच्या सहकार्यामुळे संपूर्ण कार्यक्रम सुरळीत पार पडला. उत्सवात नामवंत कीर्तनकारांनी आपापल्या कीर्तनातून भक्तिरसाची उधळण केली. पहिल्या दिवशी जागरणाच्या रात्री ह.भ.प. साध्वी वैष्णवी सरस्वती दीदी (आळंदी) यांच्या प्रभावी कीर्तनाने वातावरण भारावून गेले. दुसऱ्या दिवशी वरुथिनी एकादशी निमित्त ह.भ.प. कांचनताई जगताप (त्र्यंबकेश्वर) यांनी भाविकांना अध्यात्मिक मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवशी ह.भ.प. श्यामसुंदर महाराज सोन्नर (परळी वैजनाथ, जि. बीड) यांच्या कीर्तनाने भक्तिमय रंगत आणखी वाढवली.

उत्सवाचे विशेष आकर्षण ठरले वारसा महाराष्ट्र लोककलेचा हा सांस्कृतिक कार्यक्रम. शाहीर बाळासाहेब भागात (घोटी) यांच्या दमदार आवाजाने आणि कलाकारांच्या सशक्त सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. अखेरच्या दिवशी ह.भ.प. धनंजयदास महाराज (टेंभरे) यांच्या काल्याच्या कीर्तनाने सोहळ्याची सांगता झाली. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

या संपूर्ण उत्सवात ग्रामस्थ व परिसरातील भाविकांनी तन, मन आणि धनाने योगदान दिले. यंदाच्या उत्सवात सापळे परिवाराने विशेष सेवा देत आपला सहभाग नोंदवला.

भक्ती, परंपरा आणि एकोप्याचा सुंदर संगम असलेला हा उत्सव पुन्हा एकदा विठ्ठलगाव आल्याणीच्या सांस्कृतिक वारशाची साक्ष देऊन गेला.

## राहुल गांधीच्या दिल्लीतील लढ्यामुळेच सामान्य माणुस सुरक्षित : मलेंदर राजन



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१६, खंडाळा (सातारा) :** राष्ट्रीय कॉग्रेसच्य संघटन सृजन अभियानाच्या निमित्ताने सातारा जिल्ह्याचे केंद्रीय निरीक्षक मलेंदर राजन (आ.हिमाचल प्रदेश) यांनी वाई-खंडाळा- महाबळेश्वर तालुक्यांचा आढावा बैठक घेतली. त्यांच्या बरोबर सहनिरीक्षक मनोज कांबळे देखील उपस्थित होते. मिटींग अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात व फलदायी चर्चेत पार पडली. मलेंदर राजन यांनी कॉग्रेसची सद्यस्थिती व भविष्यकालीन करावयाची वाटचाल याबदूल नेमक्या शब्दात मार्गदर्शन केले. पक्षाचे नेते आदरणीय राहुलजी गांधी यांच्या दिल्लीतील देत असलेल्या लढ्यामुळेच देशातील सामान्य माणूस सुरक्षित आहे असे सांगितले. सातारा जिल्हा अध्यक्ष निवडी संदर्भात त्यांनी उपस्थितांशी यावेळी चर्चा केली.

खंडाळा तालुका अध्यक्ष डॉ.विजय शिंदे वाई तालुका अध्यक्ष विलास पिसाळ यांनी तालुका कमिटी अहवाल मलेंडर राजन यांना सादर केला.

यावेळी विविध मान्यवरांनी आपले विचार मांडले.महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे सरचिटणीस राजेंद्र शेलार,प्रदेश निरीक्षक मनोज कांबळे सेवादल जिल्हाध्यक्ष प्रतापसिंह देशमुख, जयदीप शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी सातारा तालुका अध्यक्ष अजय कदम, जेष्ठ सदस्य रत्नकांत भोसले, सचिन काटे, प्रदीप जायगुडे, काशिनाथ पिसाळ, नौशाद काझी, विहार पावसकर, अतुल संकराळ, मंजरी पानसे, धनश्री मालुसरे, राजकुमार जगताप, नामदेवराव दौंड, अनिल पाटील, प्रकाश शिंदे, अशोक नवघणे, दत्तात्रय पिसाळ, सुभाष घाडगे, अन्सार मुजावर, फैयाज बागवान, प्रवीण क्षीरसागर, संभाजी कांबळे, सुरेश तांबे, दादासाहेब भोसले, अजिंक्य देशमुख व वाई महाबळेश्वर खंडाळा विधानसभा मतदार संघातील प्रमुख कॉँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

## टंचाई व विकासकामांवर आमदार दातेंची आढावा बैठक; पंचायत समिती पारनेर येथे बैठक



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर पंचायत समितीच्या सभागृहात टंचाई व विविध विकासकामांची आढावा बैठक पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत तालुक्यातील विविध विभागांच्या कामांचा सखोल आढावा घेत प्रशासनाला अधिक गतिमान व लोकाभिमुख करण्यासाठी महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या. विविध लोकप्रतिनिधी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत आमदार दाते यांनी स्पष्टपणे सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत कामाच्या गुणवत्तेत तडजोड होणार नाही. नागरिकांच्या तक्रारी आल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळी जाऊन तपासणी करून तत्काळ तोडगा काढावा, तसेच सर्व कामे वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कामांचा आढावा घेताना जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या योजनांची प्रत्यक्ष पाहणी करून ग्रामस्थांच्या तक्रारी जाणून घेण्याचे आदेश देण्यात आले. अपूर्ण कामांना पूर्णत्वाचा दाखला देऊ नये, तसेच १ जूनपर्यंत संपूर्ण अहवाल सादर करण्याचे निर्देश देत योजनांची गुणवत्ता व पारदर्शकता राखण्यावर त्यांनी भर दिला. त्याचबरोबर लघु पाटबंधारेची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याबाबतही सूचना देण्यात आल्या.

घरकुल योजनांच्या आढाव्यात प्रधानमंत्री आवास, रमाई, शबरी आदी योजनांतील अपूर्ण घरे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. लाभार्थ्यांशी थेट संवाद साधून कामे गतीने पूर्ण करण्याचे निर्देश देताना आमदार दाते यांनी नुकत्याच पार पडलेल्या अधिवेशनात त्यांनी मंडलेल्या मागणीचा उल्लेख केला आणि राज्य शासनाने घरकुल अनुदानात ५० हजार रुपयांची वाढ केल्याची महत्त्वाची माहिती दिली. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

याशिवाय 'लाडकी बहिण' योजनेतील अपूर्ण ई-केवायसी साठी विशेष शिबिरे आयोजित करण्याचे, आरोग्य विभागाने लसीकरण मोहिम वेळेत पूर्ण करण्याचे तसेच पशुसंवर्धन विभागाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित भरपाई देण्याचे निर्देश देण्यात आले. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करण्यासाठी ठेकेदारांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

तालुक्यातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर सध्या सुरू असलेल्या टँकर पाणीपुरवठ्याचा आढावा घेत कायमस्वरूपी उपाययोजनांवर भर देण्याच्या सूचना करण्यात आल्या. रोजगार हमी योजनेतील कामांना गती देऊन अधिकाधिक नागरिकांनी लाभ मिळावा, यासाठी प्रशासनाने सक्रिय भूमिका घ्यावी असेही त्यांनी सांगितले.

## टाकळी ढोकेश्वर येथे दत्तनाम सप्ताहाचे आयोजन; आजपासून अखंड दत्तनाम सप्ताहास प्रारंभ




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील आदर्श गाव टाकळी ढोकेश्वर येथिल ग्रामदैवत दत्त मंदिरात सालाबादप्रमाणे यंदाही ह.भ.प गुरुवर्य बबन महाराज पायमोडे यांच्या प्रेरणेने ग्रामदैवत श्री. दत्त मंदिरात अखंड दत्तनाम सप्ताह शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ पासून सुरू होत आहे. या अखंड हरिनाम सप्ताहाचे हे ५८ वे वर्ष असून टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांनी ही परंपरा कायम सुरू ठेवली आहे.

सर्व धर्मानुरागी तथा भाविकांना कळविण्यात येते की, सालाबादप्रमाणे याही वर्षी दत्त मंदिरात ८ दिवस अखंड दत्तनामाचा जयघोष होणार असल्याने परिसरात भक्तीमय वातावरणात आहे. सप्ताहानिमित्त मंदिरात आकर्षक फुलांची सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. या सप्ताहामध्ये महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकरांची किर्तन सेवा लाभणार आहे.

या निमित्ताने पहाटे ४ ते ६ काकडा भजन सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ दररोज रात्री ७ ते ९ किर्तन व हरिजागर अखंड विना वादन असे अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि.१७ एप्रिल २०२६ रोजी ह.भ.प कबीर महाराज अत्तार, शनिवार, दि. १८ एप्रिल रोजी हभप स्वप्निल महाराज दौंडकर, रविवार दि. १९ एप्रिल रोजी ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज तांबे, सोमवार, दि.२० एप्रिल रोजी हभप सोपान महाराज सानप, मंगळवार दि. २१ एप्रिल रोजी हभप पांडुरंग महाराज उगले, बुधवार दि.२२ एप्रिल रोजी ह.भ.प विशाल महाराज खोले, गुरुवार दि.२३ एप्रिल रोजी हभप अक्रुर महाराज साखरे, शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ ते ११ वाजता श्रीकृष्णकृपांकित हभप डॉ. विकासानंद महाराज मिसाळ (पिंपळगाव वाघा) यांचे काल्याचे कीर्तन होऊन सप्ताहाची सांगता होणार आहे.

हा सप्ताह पंचक्रोशीत प्रसिद्ध असून अनेक दानशूर भाविक तसेच अन्नदाते यांचे या सप्ताहामध्ये योगदान देत आहेत. दररोज रात्री अनेक महाप्रसादाच्या पंगतीचे आयोजन केले आहे. या अखंड दत्तनाम हरिनाम सप्ताहास परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून किर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा , असे आवाहन सप्ताह आयोजक कमिटी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, सेवा सोसायटीचे चेअरमन व व्हा चेअरमन व सर्व संचालक, समस्त ग्रामस्थ टाकळी ढोकेश्वर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पाटणसह परिसराला अमली पदार्थांचा विळखा

### तरुणाई धोक्यात; तातडीच्या कारवाईची मागणी

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१६, पाटण (सातारा) :** पाटण शहर व परिसरात गांजा, चरस व इतर अमली पदार्थांची वाढती विक्री चिंतेचा विषय ठरत असून, यामुळे तरुण पिढी मोठ्या प्रमाणात व्यसनाधीनतेच्या विळख्यात सापडत असल्याचे गंभीर वास्तव समोर येत आहे.

या पार्श्वभूमीवर भाजपचे सातारा जिल्हा सरचिटणीस याज्ञसेन पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली पाटण पोलीस ठाण्यात निवेदन देऊन तातडीने कठोर कारवाईची मागणी करण्यात आली. सदर निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, पाटण शहरातील काही ठिकाणी उघडपणे गांजा व चरससारख्या अमली पदार्थांची विक्री सुरू असल्याची माहिती समोर येत आहे.




**याज्ञसेन पाटणकर यांचे पोलिसांना निवेदन**

विशेष म्हणजे, काही संशयित हालचाली शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात ही दिसून येत असल्याने पालकवर्ग, शिक्षक व नागरिकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त होत आहे.तरुण विद्यार्थी वर्ग मोठ्या प्रमाणात या व्यसनाच्या विळख्यात अडकत चालल्याने त्यांच्या आरोग्यावर, शिक्षणावर व भवितव्यावर गंभीर परिणाम होत असल्याचेही निवेदनात अधोरेखित करण्यात आले आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक असतो; मात्र तोच जर व्यसनाच्या आहारी गेला, तर समाजाच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होईल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी पोलीस प्रशासनाकडे करण्यात आलेल्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत, पाटण शहरातील संशयित ठिकाणांवर तातडीने छापेमारी करावी. अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी. शाळा व महाविद्यालय परिसरात विशेष पाळत ठेवावी. युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती मोहीम राबवावी.


दरम्यान, या निवेदनावेळी पाटण शहरातील नागरिक, बाळासाहेब देसाई कॉलेजचे प्राध्यापक, शिक्षक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व स्तरांतून या प्रश्नाबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत असून, प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी जोर धरत आहे.

## महाबळेश्वर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१६, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती महाबळेश्वर येथे उत्साहात साजरी करण्यात आली विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्यावतीने दिवसभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या शेजारी विद्युत रोषणाई व आकर्षक सजावट करण्यात आली होती. भिमसैनिक, पालिका पदाधिकाऱ्यांसह अधिकारी विविध राजकीय पक्ष सामाजिक संघटनांच्या वतीने बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी अलोट गर्दी झाली होती.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीआधी सर्वत्र आकर्षक सजावट केली होती मुख्य चौकातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास मानवंदना,पुष्पहार अर्पण करून बौद्ध पूजापाठ करण्यात आला पालिका विद्यमान नगरसेवक व जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष कुमार भाऊ शिंदे, उपाध्यक्ष उत्तम भालेराव दिलीप यादव नवतरूण बौद्ध मित्रमंडळ अध्यक्ष गौतम



मोरे,बुद्धिस्ट प्रेरणा ग्रुपचे किरण शिंदे,रमेश सपकाळ, अजिंक्य कांबळे, शांताराम मोरे, चंद्रकांत सपकाळ, नितीन गायकवाड आदींसह भीमसैनिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. जयंती उत्सव समितीच्यावतीने अनेकविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महाबळेश्वर गिरिस्थान नगरपालिकेच्या वतीने नगराध्यक्ष सुनिल शिंदे, मुख्याधिकारी योगेश पाटील, उपनगराध्यक्ष नासिरभाई मुलाणी यांच्यासह नगरसेवक अधिकारी माजी नगराध्यक्षा स्वप्नाली शिंदे, युसूफ शेख, दि.अर्बन बँकचे अध्यक्ष सी.डी.बावळेकर, उपाध्यक्ष नदीम शारवान व संचालक मंडळ तसेच शिवसेना शहरप्रमुख विजय नायडू व शिवसैनिक शिवसेना उबाठाचे उपनेते नितीन बानगुडे पाटील, हर्षल कदम, यशवंत घाडगे, राजाभाऊ गुजर आदी शिवसैनिक तसेच नगरसेविका प्रियंका वायदंडे, अक्षय वायदंडे ऋषिकेश वायदंडे, विनय गायकवाड विविध सेवाभावी संस्था संघटनांचे पदाधिकारी आदींसह मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर याना अभिवादन करण्यात आले.

दरवर्षी प्रमाणे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूकीस सायंकाळी छ.शिवाजी महाराज चौकामधून प्रारंभ झाला. ही मिरवणूक बाजारपेठ मार्गे काढण्यात येते ही मिरवणूक जयंती उत्सवाचे मुख्य आकर्षण असते. यंदा देखील मिरवणूक शेकडो भीमसैनिकांच्या उपस्थिती जलोषात काढून हा जयंती उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

# आमदार दातेंच्या हस्ते बांधकाम कामगारांना प्रमाणपत्र वाटप



## पाचशेहून अधिक कामगारांना प्रमाणपत्रांचे वाटप

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील कष्टकरी बांधकाम कामगारांच्या हक्कांना बळ देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आज पार पडला.

आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते पारनेर तालुक्यातील पाचशेहून अधिक बांधकाम कामगारांना अधिकृत बांधकाम कामगार प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा थेट लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

यावेळी आमदार दाते यांनी उपस्थित कामगारांना मार्गदर्शन करत बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. यात अपघात विमा योजना, आरोग्य सहाय्य योजना, मुलांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, प्रसूती लाभ योजना, घरकुल सहाय्य, साधनसामग्री खरेदीसाठी अनुदान, वृद्धापकाळ निवृत्ती वेतन, तसेच कामगारांच्या कुटुंबासाठी विविध आर्थिक सहाय्य योजनांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. या योजनांचा लाभ प्रत्येक पात्र कामगारापर्यंत पोहोचावा यासाठी जनजागृती होणे अत्यंत आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

> बांधकाम कामगारांसाठीच्या शासकीय योजनांचा लाभ देताना ऑनलाईन प्रक्रियेसाठी केवळ अधिकृत फीच आकारावी. त्याव्यतिरिक्त जादा रक्कम घेणे चुकीचे असून असे प्रकार तात्काळ थांबवावेत. यापुढे कष्टकरी कामगारांवर होणारा अन्याय खपवून घेतला जाणार नाही.
> **- आमदार काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

आमदार दाते यांनी सांगितले की, बांधकाम कामगार हा विकासाचा खरा शिल्पकार आहे. त्याच्या कष्टाचा सन्मान होणे ही शासनाची आणि समाजाची जबाबदारी आहे. शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक कामगारापर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत.

या कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला उपाध्यक्षा जयश्री शिंदे यांसह विविध मान्यवर उपस्थित होते. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या बांधकाम कामगारांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले.

# थोडक्यात

## ठाण्यात २० हजार लिटर अवैध पेट्रोलियमसह टँकर जप्त; ५३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१६, मुंबई :** रेशनिंग विभागास मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ठाण्यातील कोपरी पोलीस ठाणे हद्दीत पहाटेच्या सुमारास शिधावाटप भरारी पथक आणि पोलीस विभागामार्फत करण्यात आलेल्या संयुक्त कारवाईत २० हजार लिटर डिझेलसदृश अवैध पेट्रोलियम पदार्थासह टँकर जप्त करण्यात आला असून सुमारे ₹५३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणी एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती नियंत्रक शिधावाटप विभागाच्या मार्फत देण्यात आली आहे.

१६ एप्रिल २०२६ रोजी पहाटे १ ते १.३० वाजण्याच्या सुमारास एमएच-४६ / सीयू-७५३६ क्रमांकाचा टँकर कोणत्याही वैध कागदपत्रांशिवाय मोठ्या प्रमाणात डिझेलसदृश पेट्रोलियम पदार्थाची बेकायदेशीर वाहतूक करत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कोपरी पोलीस स्टेशनच्या सहकार्याने तपासणी मोहीम राबविण्यात आली.

तपासणीदरम्यान संबंधित टँकर अडविण्यात आला असता त्यामध्ये सुमारे २० हजार लिटर इतका पेट्रोलियम साठा आढळून आला. या साठ्याबाबत वैध कागदपत्रे सादर करण्यात अपयश आल्याने हा माल बेकायदेशीर असल्याचे निष्पन्न झाले. तत्काळ कारवाई करत टँकरसह संपूर्ण साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणात एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले असून उपनियंत्रक शिधावाटप कार्यालय, फ परिमंडळ ठाणे व कोपरी पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# आंबेडकर जयंतीनिमित्त नागपुरात संविधान जनजागृती; ५ हजार पुस्तिकांचे मोफत वितरण

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, नागपूर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर यांच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त संविधान जनजागृतीचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत नागरिकांना संविधानाच्या पॉकेट बुक स्वरूपातील पुस्तिका मोफत वितरित करण्यात आल्या.

भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये संविधानिक हक्क, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या याबाबत जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश या उपक्रमामागे होता. सर्वसामान्यांना सहज समजेल अशा भाषेत तयार करण्यात आलेल्या या पुस्तिका मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध करून देण्यात आल्या.

दीक्षाभूमी रोड परिसरात उभारण्यात आलेल्या स्टॉलचे उद्घाटन सुरेंद्र पवार (व्यवस्थापकीय




संचालक), विजय वाकुडकर (प्रादेशिक उपसंचालक, विमुक्त जाती व भटक्या जमाती विभाग, नागपूर), मंगेश वानखेडे (उपायुक्त, जिल्हा जात पडताळणी कार्यालय, नागपूर), अतुलकुमार वासनिक (प्रशासकीय अधिकारी) व नागसेन बागडे (मुख्य लेखा व वित्त अधिकारी) यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनानंतर उपस्थितांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या माध्यमातून सुमारे ५ हजार संविधान पुस्तिकांचे मोफत वितरण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांसह दीक्षाभूमीला भेट देणाऱ्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. समाज कल्याण विभागाच्या वतीनेही ०८ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रम अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमांत सहभागी नागरिकांना देखील संविधान पुस्तिका वितरित करण्यात आल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून लोकशाही, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित आधुनिक भारताची पायाभरणी केली. त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेला हा उपक्रम प्रभावी ठरत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

## ग्रामगीता महाविद्यालयात आंबेडकर जयंतीनिमित्त 'सलग १८ तास अभ्यास' उपक्रम

**अक्षराज : नितेश पाटील**




**दि.१५, चिमूर :** ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजी ग्रंथालय विभागामार्फत सलग १८ तास अभ्यास या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा आस्वले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. उपक्रमाच्या प्रारंभी प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुस्तकप्रेम, वाचनाची सवय आणि ज्ञानार्जनाची जिद्द यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, डॉ. आंबेडकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन ज्ञानाच्या बळावर समाजात मोठे परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या आयुष्यातील वाचनाचा छंद आणि अभ्यासाची निष्ठा ही प्रत्येक विद्यार्थ्याने आत्मसात करण्यासारखी आहे. आजच्या डिजिटल युगातही पुस्तकांचे महत्त्व कमी झालेले नाही, उलट योग्य ज्ञान मिळवण्यासाठी वाचन अत्यावश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सलग १८ तास विविध विषयांचा अभ्यास केला. स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे तसेच नियमित अभ्यास करणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. ग्रंथालयातील शांत व अभ्यासपूर्ण वातावरणामुळे विद्यार्थ्यांना एकाग्रतेने अध्ययन करता आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रंथपाल प्रा. संदिप मेश्राम यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनबद्ध कार्यामुळे उपक्रम यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. मुकेश घटे यांनी सहकार्य केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची सवय दृढ होण्यास तसेच वेळेचे व्यवस्थापन व एकाग्रता वाढविण्यास मदत झाली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवैध वीज वापर अखेर कधी थांबणार...?

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१६, शिळफाटा (ठाणे) :** दिवा-शिळ-मुंब्रा-कळवा परिसरातील अवैध वीज जोडण्या कायद्याचे उल्लंघनच नव्हे तर जनजीवनासाठी गंभीर धोका निर्माण झाला आहे. मार्च २०२० मध्ये महावितरणचे फ्रँचायझी म्हणून टोरेंट पॉवरने दिवा-शिळ -मुंब्रा-कळवा परिसरातील वीज वितरणाची जबाबदारी स्वीकारली. या भागातील वाढते तांत्रिक व वाणिज्यिक नुकसान कमी करणे तसेच नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार आणि अखंड वीजपुरवठा उपलब्ध करून देणे हा या नियोजनामागील मुख्य उद्देश आहे.

गेल्या ६ वर्षांत टोरेंट पॉवरने वीज वितरण जाळ्याचे सुदृढीकरण, पायाभूत सुविधा सुधारणा, मीटरयुक्त व कायदेशीर



वीज जोडण्या देणे तसेच वीज चोरी रोखण्यासाठी सातत्याने विविध मोहिमा राबवल्या आहेत. तरीही अत्यंत खेदजनक बाब म्हणजे काही परिसर व गृहनिर्माण संकुलांमध्ये आजही अवैध वीज वापर व नेटवर्कशी छेडछाड सुरूच आहे. देवरीपाडा, राशिद कंपाऊंड, जीवन बाग, अमृत नगर,अमीनाबाद आदी भागांमध्ये अवैध हुकिंग व नेटवर्क टॅम्परिंगमुळे वीज वाहिन्या कमकुवत होत आहेत. परिणामी वारंवार वीजपुरवठा खंडित होतोच, शिवाय शॉर्ट सर्किट, आग लागणे व अन्य विद्युत अपघातांचा गंभीर धोका निर्माण होतो. अशा दुर्घटनांमध्ये जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महत्त्वाचे म्हणजे, अवैध वीज वापरणाऱ्यांचा फटका नियमितपणे बिल भरून कायदेशीर वीज वापरणाऱ्या प्रामाणिक ग्राहकांनाही बसतो.

> **टोरेंट पॉवरचे नागरिकांना आवाहन**
> अवैध वीज जोडण्या व नेटवर्कशी छेडछाड करणाऱ्यांना कोणतेही पाठबळ देऊ नका. नेटवर्क सफाई व देखभाल कामांमध्ये टोरेंट पॉवरच्या कर्मचाऱ्यांना पूर्ण सहकार्य करा. स्वतःच्या व कुटुंबीयांच्या सुरक्षिततेसाठी केवळ मीटरयुक्त व कायदेशीर वीज जोडणीच वापरण्याचे आवाहन करत आहे.

नेटवर्क देखभालीसाठी नागरिकांचे सहकार्य अत्यावश्यक वीजपुरवठा सुरक्षित व स्थिर राखण्यासाठी टोरेंट पॉवरकडून वेळोवेळी नेटवर्क सफाई, देखभाल व अवैध जोडण्या हटविण्याची कारवाई केली जाते. मात्र काही ठिकाणी या कामांना विरोध केला जातो, त्यामुळे अत्यावश्यक सुधारणा व देखभाल कार्यात अडथळे निर्माण होतात. वेळेत नेटवर्क देखभाल न झाल्यास, येत्या भीषण उन्हाळ्यात दीर्घकाळ व वारंवार वीज खंडित होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत सर्वसामान्य नागरिक, ज्येष्ठ व्यक्ती व लहान मुलांना प्रचंड त्रास सहन करावा लागू शकतो.

# १० वर्षे मंजूर होऊनसुद्धा 'तो तावशी' रस्ता अपूर्णच ; नगरसेविका वेदिका पाटील

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१५, दिवा (ठाणे) :** ठाणे महानगरपालिका अर्थसंकल्पीय महासभेमध्ये भाजप नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले.दिवा प्रभाग समितीमध्ये येत असलेल्या प्रभाग क्र. २९ मधील अनेक विषयांवर भाष्य करताना मंजूर असलेले अनेक विकास आरखडांमधील रस्ते अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नाहीत.

कल्याण ग्रामीण विधानसभेतील पडले गाव ते खार्डी गाव (तावशीचा रस्ता) याचे उदाहरण देताना त्यांनी स्वतः कॉलेजला ये-जा करण्यासाठी रस्त्याचा वापर करत होती. परंतु १० वर्षे मंजूर होऊन सुद्धा तरी तो रस्ता अपूर्णच आहे, याची खंत व्यक्त करत आता नगरसेविका झाल्याने, आता तरी तो रस्ता पूर्णत्वास नेण्याची मागणी ठामपा प्रशासनास केली.

शिळ, डायघर, देसाई, पडले, खिडकाळी, दिवा, फडकेपाडा,



लोढा,काटई, डावले, डोंबिवली, १४ गावे या सर्वांना हा रस्त्याचा उपयोग होतो. जेव्हा वाहतूक कोंडी होते त्यावेळी हा मार्ग सोईस्कर पडतो. हा रस्ता होणे खूप गरजेचे आहे. या रस्त्यामुळे वाहन चालकांचा वेळ आणि वाहन चालण्यासाठी लागणारा पेट्रोल, डिझेल, सीएनजी, या सर्व इंधनाची बचत होणार आहे. हा रस्ता झाल्यास वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका होणार आहे.

विकास आरखाड्यामधील रस्ते पूर्ण झाल्यास नागरिकांची वाहतूक कोंडीतून मुक्तता होईल. त्याच बरोबर दिवा-साबे गावात जाण्यासाठी, शिळ-दिवा मुख्य रस्ता, -शिळ- कल्याण फाटा जाण्यासाठी रस्ता, प्रशांत नगर-साबेगाव असा रस्ता तयार करून साबे गावासाठी पर्यायी रस्ता तयार करण्याची मागणी केली. प्रभागातील पाण्याची टंचाई लक्षात घेत तसेच अनेक ठिकाणी जलकुंभ उभे करून जलवाहिनीचे जाळे निर्माण करून नागरिकांना पाणीटंचाईतून मुक्त करण्याची मागणी केली. शिक्षण विषयावर भर देत अनेक शाळांना मुलभूत सोयीसुविधा नसल्याचे निदर्शनास आणले. तसेच अनेक शाळेत विद्यार्थिनींसाठी सॅनिटरी पॅड मशीनची उपलब्धता करून देण्याची तसेच डायघर, खार्डी गावतील शाळा इयत्ता दहावीपर्यंत करण्यची मागणी केली. महिला सुरक्षेवर भर देत गावोगावी विद्युत पथदिवे त्याच बरोबर सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवण्याची मागणी केली.

# खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात अग्निशमन सेवा सप्ताह साजरा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, नागपूर :** खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या अग्निशमन विभागामार्फत अग्निशमन सेवा सप्ताह २०२६ निमित्त कर्तव्य बजावताना शहीद झालेल्या अग्निशमन जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी सर्वसामान्य नागरिकामध्ये अग्नी सुरक्षेबाबत जनजागृती करण्याच्या दृष्टीकोनातून भव्य अग्निशमन रॅलीचेही आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे आयोजन मुख्य अभियंता विवेक रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. उपमुख्य अभियंता नारायण राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत शहीद जवानांच्या स्मृतींना पुष्पचक्र अर्पण करून मानवंदना देण्यात आली, शिवाय शहीद जवानांच्या राष्ट्रसेवेतील सर्वोच्च बलिदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

**जनजागृती रॅलीचे आयोजन...**

केवळ खापरखेडा औष्णिक वीज केंद्रा पर्यंत मर्यादित न ठेवता आगीच्या दुर्घटना टाळणे व सुरक्षा नियमांचे पालन करण्यासाठी अग्निशमन वाहनांची एक रॅली काढण्यात आली होती. याप्रसंगी रॅलीच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना आणि स्थानिक नागरिकांना अग्नी सुरक्षेचे महत्त्व पटवून देण्यात आले.कार्यक्रमाला उपमुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, विविध विभागांचे प्रमुख, कर्मचारीवृंद आणि कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्तविक अग्निशमन अधिकारी चेतन कुमार अघम यांनी केले संचालन कनिष्ठ अग्निशमन अधिकारी आदित्य वैद्य यांनी केले प्रफुल सरोदे, अविनाश बावणे व रोहन राऊत यांनी





सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संदीप नगरारे, सुजित बागडे, श्यामकुमार तातोड, निखिल लुटे, राजेंद्र खटके, विनय उईके, इरफान शेख, विजय शिवणकर, भूषण चवरे, महेश मुंडे, ओमप्रकाश इंगोले, विजय उदयकर, भरत भांडवलकर, नितीन येनवसकर, राहुल धनोकार, नंदलाल भुसारी, संतोष भोंगाडे, धीरज कडवे, पवन आयलेणीवर यांच्यासह इतर अग्निशमन कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी शहीद अग्निवीरांचे बलिदान सदैव स्मरणात राहील आणि त्यांच्या प्रेरणेतूनच आम्ही सुरक्षेचे कवच अधिक मजबूत करू असा निर्धार व्यक्त करण्यात आला.